# सातही दलालांना एनसीबीकडून अटक

## रिया-शौविक व सुशांतला पोहोचवत होते अमली पदार्थ

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

नारकॉटिक्स कन्ट्रोल ब्युरोने (एनसीबी) अमली पदार्थांच्या सातही दलालांना रविवारी अटक केली. मुंबई व गोव्यात एकाचवेळी केलेल्या कारवाईत एनसीबीचे सहसंचालक समीर वानखेडे यांच्या पथकाने या सात दलालांना शनिवारी गाठून ताब्यात घेतले होते. रात्रभराच्या चौकशीनंतर रविवारी त्यांना अटक करण्यात आली.

अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मैत्रीण रिया चक्रवर्ती ही तिचा भाऊ शौविक व सुशांतचा व्यवस्थापक सॅम्युएल मिरांडामार्फत अमली पदार्थ मागवून ते सुशांतसिंहला देत होती, असे प्रारंभी सीबीआय व त्यानंतर एनसीबीच्या तपासात समोर आले. शौविक व सॅम्युएलला अमली पदार्थ पोहोविणाऱ्या दोन दलालांनाही एनसीबीने पकडले होते. त्यानंतर वानखेडे यांच्या पथकाने शनिवारी सर्वात मोठी कारवाई करीत एकाच वेळी सात जणांना ताब्यात घेतले होते.




याबाबत एनसीबी मुंबई क्षेत्राचे सहसंचालक समीर वानखेडे यांनी सांगितले, 'हे सातही जण चरस व गांजाचा पुरवठा करणारे आहेत. त्यांच्यापैकी करमजीत हा चरस व गांजाचा पुरवठा करणारा मुंबईतील सर्वात मोठ्या दलालांपैकी एक आहे. करमजीत सातत्याने सुशांतसिंह, रिया व शौविकला अमली पदार्थांचा पुरवठा करीत असल्याची माहिती मिळाली आहे. अधिक तपासासाठी या सर्व सात जणांना अटक करण्यात आली असून सोमवारी त्यांना न्यायालयात हजर केले जाणार आहे.'

### सीबीआयकडून चालकाची चौकशी

या प्रकरणात एनसीबीने तपास सुरू केल्यापासून मुख्य तपास करणारी सीबीआय काही दिवस शांत होती. पण, रविवारी सीबीआयने पुन्हा एकदा तपास सुरू केला. सुशांतसिंहचा माजी वाहनचालक अनिल याची सीबीआयने कलिना येथील कार्यालयात चौकशी केली. सुशांतसिंह नेमके कुठे कुठे जात होता, अमली पदार्थांचे सेवन करीत होता किंवा नाही आदी प्रश्न त्याला विचारण्यात आले. परंतु आपल्याला फक्त अडीच महिने कामावर ठेवले व नंतर काढून टाकले, असे अनिल यांनी सीबीआयला सांगितल्याची सूत्रांची माहिती आहे.

## तरुणीचा विनयभंग करणाऱ्याला बेड्या

**मुंबई :** रेल्वे स्थानकात अत्यावश्यक सेवेतील तरुणीचा विनयभंग करणाऱ्या तरुणाला बोरिवली रेल्वे पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रामेश्वर स्वामीनाथ (२५) असे या आरोपीचे नाव आहे. त्याची रवानगी कोठडीत केली असून, त्याच्यावर रेल्वे हद्दीत अन्य काही गुन्हे आहे का? याबाबत रेल्वे पोलिस तपास करत आहेत.

गोरेगाव येथे राहणारी खासगी अत्यावश्यक सेवेत काम करणारी तरुणी गोरेगाव ते बोरिवली असा प्रवास करत होती. ९ सप्टेंबरला सायंकाळी पावणेआठच्या सुमारास बोरिवली स्थानकात उतरून चालत असताना अज्ञात तरुणाने त्या तरुणीचा विनयभंग केला. तरुणीने मदतीसाठी आरडाओरड करताच आरोपी धावती लोकल पकडून पसार झाला होता.

आरोपीचा शोध घेण्यासाठी बोरिवली रेल्वे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भास्कर पवार यांच्यासह पोलिस निरीक्षक सचिन इंगवले आणि गुन्हे शाखेचे सपोनि तुषार बाविस्कर यांनी बोरिवली ते दहिसर दरम्यान सापळा रचला. सीसीटीव्हीमधून मिळालेल्या संशयिताच्या रेखाचित्राआधारे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता, गुन्हा केल्याचा कबुली जबाब त्याने दिला आहे.

# किनारपट्टीवर पाऊस सक्रिय

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईकरांना अनेक दिवसांच्या उकाड्यापासून थोडा दिलासा मिळाला. किमान व कमाल तापमानाचा पारा किंचित खाली आला. मुंबईत अधूनमधून विश्रांती घेत फारसा पाऊस कोसळला नाही, तरी काही काळ गार वाऱ्यांचाही अनुभव मुंबईकरांना घेता आला. रविवारी मुंबईत कुलाबा येथे अजिबात पाऊस नव्हता, तर सांताक्रूझ येथे अवघ्या २.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. मात्र, कुलाब्यात कमाल तापमान ३२.२ तर सांताक्रूझ येथे ३१.७ अंश सेल्सिअस होते. रविवारी रात्री ८.३० पर्यंतच्या २४ तासात तुरळक ठिकाणी ठिकाणी पावसाची नोंद झाली. सोमवारीही मुंबईत हलक्या ते मध्यम सरींचाच अंदाज आहे. मात्र, उर्वरित कोकण पट्ट्यात पावसाचे प्रमाण अधिक असेल.

सध्या बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. सोमवारी याची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. येत्या चार दिवसांमध्ये हे क्षेत्र आणि संबंधित चक्रीय वात स्थित पश्चिम ते वायव्य पट्ट्यातून प्रवास करेल. सध्या मान्सून ट्रफ त्याच्या सर्वसाधारण स्थितीमध्ये आहे. त्याचा पूर्वेकडील भाग दक्षिण दिशेला सरकण्याची शक्यता आहे. गुजरात ते कर्नाटक किनारपट्टीवर ढगांची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर १७ सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

येत्या आठवड्यात मंगळवारवगळता पालघरमध्ये गुरुवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस आहे. ठाण्यामध्ये बुधवारी आणि गुरुवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सोमवारी आणि मंगळवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**दि जळगाव पीपल्स को-ऑप.बँक लि.** १९३३ पासून
(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)
विश्वासाचे अतूट नाते
रजि.ऑफीस: १५२, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगांव. फोन २२२७७११ ते १६.

**सूचना : फक्त सभासदांसाठी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर राखण्याच्या उद्देशाने आणि केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांच्या परिपत्रकानुसार या नोटीस व्दारे बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडीओ कॉन्फरसींग किंवा ओएव्हीएम व्दारे (Other Audio Visual Means) घेण्याचे ठरविले आहे. बँकेच्या ३१.०३.२०२० पर्यंत सर्व नोंदणीकृत सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेण्याकरीता **आपले नाव, सभासद क्रमांक, मोबाईल क्रमांक अणि ईमेल आयडी** ही माहिती बँकेच्या **shares@jpcbank.com** या ईमेल वर किंवा नजिकच्या शाखेत १८ सप्टेंबर २०२० पर्यंत नोंदवावे ही विनंती. यामुळे बँकेला सर्व सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर किंवा ईमेल वर व्हिडीओ कॉन्फरसींग किंवा ओएव्हीएम व्दारे घेतल्या जाणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचना पाठविणे सुलभ होईल. सदर सूचना बँकेची वेबसाईट www.jpcbank.com वर सुद्धा उपलब्ध राहील.

जळगाव
११.०९.२०२०

संचालक मंडळाच्या आदेशावरून
दिलीप देशमुख (प्रबंध संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी)

**हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड**
(एक महारत्न कंपनी)
INDUSTRIAL & CONSUMER — Energising Growth

**पीओएल ॲग्रिगेटरच्या नियुक्तीसाठी सूचना**

हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) ने FO/LDO/MTO आणि इंडस्ट्रियल SKO या विविध पेट्रोलियम उत्पादनांची विक्री महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, गोवा या राज्यांमध्ये तसेच दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीवच्या केंद्र शासित प्रदेशां मध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) विभागांत करण्या करीता ॲग्रिगेटर नेमण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

निवडपात्रता आणि मूल्यमापनाचे मानदंड यांचे तपशील तसेच अर्जाची प्रत एचपीसीएल च्या वेबसाइट **www.hindustanpetroleum.com** वरून डाउनलोड केले जाऊ शकतात. वरील जाहिरातीं मधील सर्व पुनरावृत्ती, स्पष्टीकरण, विवरण, परिशिष्ट, वेळ विस्तार इत्यादी केवळ वरील वेबसाइट वरच दिली जाईल. स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी अर्जदारांनी नियमित पणे या वेबसाइटला भेट द्यावी.

संलग्नकांसह विधिवत भरलेले अर्ज आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड च्या नावाने काढलेला ₹ ११८०/- (एक हजार एकशे ऐंशी) चा डिमांड ड्राफ्ट प्रत्येक स्थानासाठी दर्शविलेल्या पत्त्यावर १४ ऑक्टोबर २०२० ला किंवा त्या पूर्वी कार्यालयीन वेळ समाप्ती अर्थात १७:०० च्या आत सादर करावेत.

स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर | UJJWALA | 150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

# डम्परखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

### बॅरिकेड पडल्याने अपघात; एक जखमी

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

पश्चिम द्रुतगती मार्गावर आकुर्ली पुलाजवळ बॅरिकेड पडल्याने तोल जाऊन डम्परखाली आलेल्या मनोज पवार (२८) या दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याने मुंबईत खळबळ उडाली आहे. याच अपघातात जबर जखमी झालेला प्रशांत आंबेकर (२७) शताब्दी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. एकीकडे रस्त्यातील खड्डे चुकवण्याचे आव्हान मुंबईकरांसमोर असताना, जीव वाचवण्यासाठी बॅरिकेड पाहून प्रवास करण्याची वेळ आली आहे.




शनिवारी, दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास कुरार, क्रांती नगर येथील प्रशांत आणि मनोज हे बोरिवलीहून परत येत असताना आकुर्ली पुलाजवळ हा धक्कादायक प्रसंग ओढवला. प्रशांत दुचाकी चालवत होता, तर मनोज त्याच्या मागे बसला होता. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठेवलेला बॅरिकेड अचानक या दोघांवर कोसळल्याने त्यांचा तोल गेला आणि मागाहून येणाऱ्या डम्परने त्यांना धडक दिली. डम्परच्या मागील चाकांखाली येऊन मनोजचा जागीच मृत्यू झाला, तर प्रशांतच्या डोक्याला जबर मार बसला.

प्रथमदर्शनी हा बॅरिकेड मेट्रो कामासंबंधी बांधकामातील असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र या अपघाताचा मेट्रोच्या कामांशी काही संबंध नाही. अपघाताच्या ठिकाणी किंवा जवळ कुठलेही मेट्रोचे सिव्हिल काम चालू नाही, असे स्पष्टीकरण एमएमआरडीएचे सहआयुक्त बीजी पवार यांनी दिले.

मात्र एमएमआरडीएच्या कंत्राटदाराकडूनच अपघात-स्थळाजवळ सब-वेचे काम सुरू असल्याचे म्हटले जाते. सद्यस्थितीत दोन्ही महामार्गांची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आहे. अलीकडेच कोट्यवधी रुपये खर्च करून या महामार्गांच्या देखभाल दुरुस्तीची कामे प्राधिकरणाने हाती घेतली होती. घटनास्थळाजवळ कोणतेही बांधकाम सुरू नसल्याचा दावा एमएमआरडीएने केला आहे. याबाबत अद्याप कंत्राटदारावर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. मात्र सर्व कंत्राटदारांना एसओपीचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश प्राधिकरणाकडून देण्यात आल्याचे कळते.

यापूर्वीही बॅरिकेड पडून अपघात होण्याच्या घटना मुंबईत घडल्या आहेत. या घटनेकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे. या घटनेबद्दल कंत्राटदार आणि डम्परचालकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून पवईतील मिलिंद नगर येथे राहणाऱ्या ३२ वर्षीय बबलू यादव या डम्परचालकाला अटक करण्यात आल्याचे कळते.




**SBI स्टेट बँक ऑफ इंडिया,** प्रभावित मालमत्ता व्यवस्थापन शाखा
१ला मजला, प्लॉट क्र. १, अरेरा हिल्स, भोपाळ - ४६२०११ (म.प्र.) ई-मेल: sbi.04293@sbi.co.in दूर.: ०७५५-२५७५४७१, २५७५२०९

**परिशिष्ट-IV-ए**
**[नियम ८(६) करिता अटी पहा]**
**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**
**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) करिता अटींसह**
**स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

याद्वारे सामान्य जनता आणि विशेषत्वाने कर्जदार(रां)ना आणि गॅरेंटर(र्स)ना सूचना देण्यात येत आहे की, कन्सोर्टियम बँकांकडे ज्यात स्टेट बँक ऑफ इंडिया, **सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, कॅनरा बँक (येथे यानंतर कन्सोर्टियम म्हणून संबोधित)** यांचा समावेश आहे यांच्याकडे येथे खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता तारण/प्रभारित ठेवलेल्या आहेत, सिक्युअर्ड क्रेडिटर म्हणून ज्यांचा भौतिक ताबा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी कन्सोर्टियम सदस्य बँकांच्या वतीने घेतला आहे, त्या **मेसर्स गोयल ॲग्रीग्रिन फिल्ड्स प्रा. लि. (कर्जदार)** पत्ताः गाव - केसला, तहसिल - इटारसी, जि. होशंगाबाद (म.प्र.) आणि गॅरेंटर्स/कॉर्पोरेट गॅरेंटर्स
(i) **मेसर्स राईटबँक ग्रीन ॲग्रो सोल्युशन्स प्रा. लि. (कॉर्पोरेट गॅरेंटर)**
(ii) **मेसर्स अंहिता फायनान्शियल सर्व्हिसेस (बॉम्बे) प्रा. लि. (पूर्वीची मेसर्स आर्क फायनान्शियल सर्व्हिस बॉम्बे प्रा. लि.) (कॉर्पोरेट गॅरेंटर)**
(iii) **मेसर्स किंगसाईझ प्रॉपर्टीज प्रा. लि. (कॉर्पोरेट गॅरेंटर)**
(iv) **मुकुल काकर S/o अजय कुमार काकर, (गॅरेंटर)**
(v) **मुकुल महेंद्रु S/o प्रदिप कुमार महेंद्रु, (गॅरेंटर)**
यांच्याकडून सिक्युअर्ड क्रेडिटरला देय रक्कम **रू. १२७,३६,३९,०९१.०० (रूपये एक सौ सत्तावीस कोटी छत्तीस लाख एकोणचाळीस हजार आणि एक्याण्णव मात्र)** १५.०७.२०१६ रोजी पर्यंत + १६.०७.२०१६ पासूनचे व्याज किंमती आणि खर्चासह (मागणी सूचना दिनांकीत १५.०७.२०१६ नुसार) एकत्रितपणे इतक्या रकमेच्या परतफेडीसाठी **३०.०९.२०२०** रोजी "जे आहे जेथे आहे", "जे आहे जसे आहे" आणि "जे काही तेथे आहे" आधारावर विक्री करण्यात येईल.
राखीव किंमत, इसारा रक्कम ठेव (इरठे) आणि बोली वाढ खालील तक्त्यामध्ये दिल्या प्रमाणे असेलः

| शीर्षक विलेख धारकाचे नाव | मालमत्ता/त्तांचे वर्णन | राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव (इरठे) / बोली वाढीची रक्कम |
|---|---|---|
| **मेसर्स किंगसाईझ प्रॉपर्टीज प्रा. लि.** | कार्यालय युनिट क्र. ८०१, ८वा मजला, वैदेही परम हाऊस, सर्व्हे क्र. ३५६ हिस्सा क्र. १ व २, सीटीएस क्र. ४०९३ व ४०९२, गाव कोळे कल्याण, सांताक्रूझ (पू), मुंबई चटई क्षेत्र २०७० चौ. फू. असलेले. **भौतिक ताबा दिनांक : २८-०२-२०१७** | **राखीव किंमत (रू) ३,९७,००,०००/- इसारा रक्कम ठेव (इरठे) राखीव किंमतीच्या १०% म्हणजेच रू.३९,७०,०००/- बोली वाढीची रक्कम रू. २५,०००/-** |

**सूचना :** माननीय डीआरटी, जबलपूर यांच्या समक्ष एक सिक्युरिटायझेशन अर्ज (एस. ए. क्र. ३४०/२०१६) कर्जदार/गॅरेंटर्स द्वारा दाखल केला गेला आहे जो निवाड्यासाठी प्रलंबित आहे. म्हणून, लिलाव वरील सिक्युरिटायझेशन अर्जाच्या निर्णयाच्या अधीन आहे.

**ई-लिलावाची तारीख आणि वेळ : ३०-०९-२०२० स. ११.०० ते दु. २.०० पर्यंत**
**प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह**
**सहभागाचे विनंती पत्र / केवायसी कागदपत्र / इरठेचा पुरावा इ. सादर करण्यासाठी तारीख आणि वेळ : २८.०९.२०२० रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी**

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सिक्युअर्ड क्रेडीटर वेबसाईट https://www.sbi.co.in, मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि. पोर्टल **https://www.bankeauctions.com** वर प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

**नियम ९(१) च्या अटीं अंतर्गत वैधानिक सूचना**

हे प्रकाशन सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९(१) च्या अटीं अंतर्गत आवश्यकतेनुसार कर्जदार/गॅरेंटर्स/मॉर्टगेजर्स यांना देखील देण्यात येत आहे.

**दिनांक : १४-०९-२०२० ठिकाण : भोपाळ** — **अधिकृत अधिकारी**

**Siyaram's®**
PREMIUM SUITINGS & SHIRTINGS

**SIYARAM SILK MILLS LTD.**
CIN : L17116MH1978PLC020451
Regd. Office: H-3/2, MIDC 'A' Road, Tarapur, Boisar, Dist. Palghar, PIN 401 506 (M.S.),
Phone - 7506794051; Email - sharedept@siyaram.com; Website - www.siyaram.com

**EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2020.**

(₹ in Lakhs)

| PARTICULARS | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Quarter Ended | | | Year Ended | Quarter Ended | | | Year Ended |
| | 30.06.2020 (Unaudited) | 30.06.2019 (Unaudited) | 31.03.2020 (Audited) | 31.03.2020 (Audited) | 30.06.2020 (Unaudited) | 30.06.2019 (Unaudited) | 31.03.2020 (Audited) | 31.03.2020 (Audited) |
| Revenue from Operations | 4,101 | 32,595 | 46,667 | 1,69,802 | 4,130 | 32,619 | 46,689 | 1,69,930 |
| Other Income | 460 | 651 | 1,588 | 3,416 | 458 | 644 | 1,577 | 3,381 |
| Total Income | 4,561 | 33,246 | 48,255 | 1,73,218 | 4,588 | 33,263 | 48,266 | 1,73,311 |
| Net Profit for the period before tax | (9,079) | 1,523 | 3,036 | 8,760 | (9,117) | 1,481 | 2,978 | 8,516 |
| Net Profit for the period after tax | (6,733) | 998 | 2,333 | 7,169 | (6,771) | 956 | 2,275 | 6,925 |
| Total Comprehensive Income | (6,763) | 988 | 2,255 | 7,057 | (6,805) | 932 | 2,204 | 6,820 |
| Paid up Equity Share Capital | 937 | 937 | 937 | 937 | 937 | 937 | 937 | 937 |
| (Face value of ₹ 2/- per share) | | | | | | | | |
| Earnings Per Share (of ₹ 2/- each) | | | | | | | | |
| Basic and Diluted (₹) (not annualised) | (14.37) | 2.13 | 4.98 | 15.30 | (14.45) | 2.04 | 4.85 | 14.77 |

Notes:
1. The results were reviewed by the audit committee and taken on record by the Board of Directors at its meeting held on 12.09.2020.
2. The above is an extract of the detailed format of Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter ended 30th June, 2020 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of quarterly financial results are available on the Stock Exchange websites, www.nseindia.com and www.bseindia.com and on the Company's website www.siyaram.com.

For SIYARAM SILK MILLS LTD.
Sd/-
(Ramesh Poddar)
Chairman & Managing Director
DIN : 00090104

Place : Mumbai
Date : 12/09/2020

J.HAMPSTEAD WORLD'S FINEST FABRIC & APPAREL | MiSTAIR IMPACT DRESSING A quality product from Siyaram's | Siyaram's ROYALE LINEN premium linen fabric | OXEMBERG | Siyaram's MOZZO | Siyaram's INSPIRO